# शिक्षक व अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धा नियमावली

राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणा-या सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शांळामधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी, कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षकीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक, प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करणे, त्यांच्यात समन्वय सहकार्य व स्पर्धात्मकतेची भावना निर्माण करणे तसेच त्यांच्या विषयनिहाय **आशयज्ञान, अध्यापन कौशल्ये आणि मूल्यांकन पद्धतींचे ज्ञान यांना** चालना देण्याच्या उद्देशाने तालुका,विभाग व राज्यस्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन शैक्षणिक करण्यात येत आहे. या स्पर्धाच्या आयोजनासाठी निकष आणि नियमावली तयार करण्यात आली आहे. सदर स्पर्धा एकूण ४३ विषयांवर आधारित असणार आहेत. त्यापैकी **विज्ञान ऑलिंपियाड** स्पर्धा आयोजनाची जबाबदारी राज्यस्तरावर विज्ञान विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे यांच्याकडे आहे.

**उद्दिष्टे:**

- विज्ञान विषयातील प्रावीण्य विज्ञान ऑलिम्पियाडच्या माध्यमातून तपासणे व आकलन वाढविणे.
- विज्ञान विषयातील प्रावीण्य व गुणवत्ता तपासून राज्यस्तरावर त्यांचा सन्मान करणे.
- विज्ञान विषयाबाबत अभिरुची विकसित करणे .
- उत्कृष्ट विज्ञान शिक्षकांचे राज्यस्तरीय बेंचमार्क ठरविणे.

## विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेसाठी सर्वसाधारण नियम :

1. तालुका, विभाग व राज्यस्तरावर विज्ञान ऑलिंपियाड या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे.
2. स्पर्धेच्या नाव नोंदणीसाठी राज्यस्तरावरून लिंक पुरविण्यात आली आहे.
3. स्पर्धेसाठी नावनोंदणी करण्याची जबाबदारी केंद्रप्रमुख यांच्यावर सोपविण्यात आली आहे.
4. सर्व केंद्रप्रमुख यांनी आपल्या केंद्रातून किमान एक शिक्षक स्पर्धेमध्ये सहभागी होईल यासाठी प्रोत्साहित करावे. सहभागी स्पर्धकांची याबाबत लेखी संमती घ्यावी.
5. सहभागी स्पर्धकाची माहिती राज्यस्तरावरून पुरविलेल्या लिंकवर नोंदवावी.
6. सर्व स्पर्धेसाठी तालुकास्तरावर सहभाग घेणाऱ्या शिक्षक, कर्मचारी व अधिकारी यांचे नामनिर्देशन गुगल फॉर्मद्वारे संकलित केले जाईल.
7. दि. ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत केंद्रप्रमुख यांनी स्पर्धकांची माहिती भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.
8. या स्पर्धांची तयारी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुट्टी घेता येणार नाही तसेच शिक्षकांच्या सहभागामुळे अध्ययन अध्यापनाचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी.
9. तालुकास्तरावरील प्रत्येक स्पर्धेचा विजेता स्पर्धक विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र राहील.
10. विभाग स्तरावरील प्रथम पाच क्रमांकाचे विजेते राज्यस्तरावर सहभागासाठी पात्र राहतील.
11. राज्यस्तरावर सहभागी स्पर्धकांपैकी प्रथम दहा स्पर्धक विजेते म्हणून निवडण्यात येतील.
12. स्पर्धेच्या नियमावलीसोबत जोडलेल्या समितीच्या बैठकीचे आयोजन करून स्पर्धेविषयी माहिती द्यावी.

## विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेचे स्वरूप :

1. इयत्ता १ ली ते १२ साठी अध्यापन करणारे शिक्षक तसेच अधिकारी व कर्मचारी हे स्पर्धेत सहभागी होवू शकतात.
2. विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धा लेखी चाचणी स्वरुपात (ऑफलाईन/ऑनलाईन) घेण्यात येईल.
3. स्पर्धा वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
4. एकूण **१०० गुणांची** प्रश्नपत्रिका असेल. प्रश्न **संख्या ५०** असेल व **वेळ ९० मिनिटे** असेल.
5. प्रश्नपत्रिका द्विभाषिक असेल.(मराठी व इंग्रजी)
6. सर्व प्रश्न अनिवार्य असतील.
7. **नकारात्मक गुणदान पद्धती** लागू राहील.
8. प्रस्तुत स्पर्धेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना स्पर्धकाच्या उत्तर पत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच उमेदवारांनी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तर पत्रिकेत नमूद करावीत. उत्तरपत्रिकेत सोडवलेल्या प्रत्येकी दोन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील.
9. पेपर सोडविण्यासाठी निळा अथवा काळा बॉलपेन वापरावा.
10. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.
11. स्पर्धेचे स्वरूप तालुकास्तर, विभागस्तर व राज्यस्तरासाठी मुद्दा क्र.१ ते १० नुसार असेल.

## अभ्यासक्रम :

- इ.३ री ते १० वीचा विज्ञान विषयाचा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम गृहीत धरण्यात येईल.
- याबरोबरच विज्ञान आणि सामान्यज्ञान ,वैज्ञानिक दृष्टीकोन, विज्ञान विषयातील चालू घडामोडी, भारतीय संशोधक, नवोपक्रम , पर्यावरणीय जाणीवजागृती, समस्या निराकरण कौशल्यावर आधारित प्रश्न इ.घटकांचा समावेश असेल.

## तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजन :

1. तालुकास्तरीय स्पर्धेचे आयोजन गटशिक्षणाधिकारी यांनी करावे.यामध्ये परीक्षा केंद्र निवड,परीक्षा केंद्रावरील सुविधा,पर्यवेक्षक नियुक्ती व अनुषंगिक मनुष्यबळ उपलब्धता इ.बाबींचा समावेश असेल
2. स्पर्धेचे सनियंत्रण प्राचार्य ,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी करावे. यामध्ये प्रश्नपत्रिका उपलब्धता,वेळेचे नियोजन व गोपनीयता संबंधित बाबी,स्पर्धेचे मूल्यांकन व अंतिम निकाल इ.बाबींचा समावेश असेल.
3. उमेदवारांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट तालुका स्तरावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने ,विभाग स्तरावर प्रादेशिक विद्या प्राधिकरण किंवा आयोजक जिल्हा शिक्षण व प्रशिक्ष संस्था यांनी तर राज्य स्तरावर विज्ञान विभाग, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र पुणे यांच्या मार्फत उपलब्ध करून देण्या येतील.

**विभागस्तरीय विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेचे आयोजन :**

- विभागस्तरीय स्पर्धांचे आयोजन विभागातील सर्व जिल्ह्यांच्या सहभागाने मुंबई,नागपूर व छत्रपती संभाजी नगर या विभागांसाठी अनुक्रमे प्रादेशिक विद्या प्राधिकरण,मुंबई,नागपूर,छत्रपती संभाजीनगर यांनी व उर्वरित सर्व विभागांसाठी विभाग मुख्यालयाच्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने करावे.
- यासाठी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांचीही मदत घ्यावी. यामध्ये परीक्षा केंद्र निवड,परीक्षा केंद्रावरील सुविधा,पर्यवेक्षक नियुक्ती व अनुषंगिक मनुष्यबळ उपलब्धता,प्रश्नपत्रिका उपलब्धता,वेळेचे नियोजन व गोपनीयता संबंधित बाबी,स्पर्धेचे मूल्यांकन व अंतिम निकाल इ.बाबींचा समावेश असेल.
- उमेदवारांच्या संख्येनुसार आवश्यक प्रिंट प्रादेशिक विद्या प्राधिकरण किंवा आयोजक जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्या मार्फत उपलब्ध करून देण्यात येतील.

**राज्यस्तरीय विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेचे आयोजन :**

राज्यस्तरीय विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धेचे आयोजन विज्ञान विभाग,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र, पुणे यांचेमार्फत करण्यात येईल.

**मूल्यमापन**

- उत्तरपत्रिका तपासणी व आवश्यक सर्व कामकाज आपल्या स्तरावर विहित कालावधीत पूर्ण करावे. उत्तरपत्रिका तपासणीसाठी डी.एड. प्राचार्य/अध्यापकाचार्य यांचा समावेश करावा. या सर्व कामकाजात गोपनियता असणे अत्यंत आवश्यक आहे. सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी तालुका व विभाग व राज्य स्तरावर सनियंत्रण समिती गठीत करण्यात यावी.
- विज्ञान ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेचे मूल्यमापन तालुकास्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर विभागस्तराचे मूल्यमापन विभागस्तरावर निश्चित केलेल्या समितीद्वारे तर राज्य स्तराचे मूल्यमापन राज्यस्तरीय समितीद्वारे होईल.मूल्यमापन केल्यानंतर विविध समित्यांनी सर्व प्रश्नपत्रिकांचे जतन करून ठेवावे.

**स्पर्धेचे वेळापत्रक-**

सदर स्पर्धा तालूका, विभाग व राज्यस्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे,

१. तालुकास्तरीय स्पर्धा : नोव्हेंबर २०२५ (चौथा शनिवार)

२. विभागस्तर स्पर्धा : डिसेंबर २०२५ (चौथा शनिवार )

३. राज्यस्तर स्पर्धा : जानेवारी २०२६ (चौथा शनिवार)

स्पर्धांच्या आयोजनासंदर्भात राज्य स्तरावरून निर्गमित करण्यात आलेल्या दि.१०.१०.२०२५ च्या पत्रातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.